रविवार दि. ९ ऑगस्ट २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३३९ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद माने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

### दैनिक युवा आदर्शच्या नूतन कार्यालयाचा उत्साहात शुभारंभ; दिवसभर मान्यवरांच्या सदिच्छा भेटी, शुभेच्छांचा वर्षाव

# मनपाच्या नव्या कॉम्प्लेक्समध्ये वृत्तपत्रांसाठी गाळे राखीव ठेवणार- महापौर वंदना मगरे

## उपमहापौर राजेश राऊत व अक्षय गोरंट्याल यांचाही पाठिंबा

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील लोकप्रिय दैनिक युवा आदर्शच्या नूतन कार्यालयाचा स्थलांतर सोहळा गुरुवारी (दि. ७) उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. धार्मिक विधी, फित कापून उद्घाटन, मान्यवरांच्या सदिच्छा भेटी आणि दिवसभर शुभेच्छांचा वर्षाव अशा उत्साही वातावरणात हा सोहळा संपन्न झाला. विविध राजकीय, सामाजिक, पत्रकारिता, क्रीडा, उद्योग व व्यावसायिक क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून दैनिक युवा आदर्शचे संपादक दीपक शेळके यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ९ वाजता महापूजेने झाली. त्यानंतर सकाळी ११ वाजता शिवसेनेचे नेते विष्णू पाचफुले यांच्या हस्ते नूतन कार्यालयाचे फित कापून उद्घाटन करण्यात आले. यावेळी त्यांनी दैनिक युवा आदर्शच्या यशस्वी वाटचालीबद्दल समाधान व्यक्त करत भविष्यातही निर्भीड आणि जनहिताची पत्रकारिता कायम ठेवण्याच्या शुभेच्छा विष्णु पाचफुले यांनी दिल्या.

**महापौर वंदना मगरे यांचे पत्रकारांसाठी मोठे आश्वासन**

सायंकाळी महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, नगरसेवक अक्षय गोरंट्याल तसेच अभियंता सय्यद साऊत यांनी नूतन कार्यालयाला सदिच्छा भेट दिली.यावेळी बोलताना महापौर वंदना मगरे म्हणाल्या की, ‘‘दैनिक युवा आदर्शने अल्पावधीतच विश्वासार्ह पत्रकारितेच्या जोरावर वेगळी ओळख निर्माण केली आहे. संपादक दीपक शेळके यांनी अशीच जनतेच्या प्रश्नांवर आवाज उठवत पत्रकारिता करत राहावी. मनपा प्रशासनाकडून उभारण्यात येणाऱ्या नवीन व्यावसायिक कॉम्प्लेक्समध्ये वृत्तपत्रांसाठी स्वतंत्र गाळे राखीव ठेवण्याचा प्रयत्न केला जाईल,‘‘ असे आश्वासन त्यांनी दिले.

**उपमहापौर राजेश राऊत यांचा दुजोरा**

महापौरांच्या वक्तव्याला दुजोरा देताना उपमहापौर राजेश राऊत यांनी पत्रकारांसाठी मनपाच्या नव्या कॉम्प्लेक्समध्ये गाळे राखीव ठेवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करू, असे आश्वासन दिले. पत्रकारांना स्वतंत्र आणि सुसज्ज कार्यस्थळ उपलब्ध व्हावे, यासाठी सकारात्मक भूमिका घेऊ, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**नगरसेवक अक्षय गोरंट्याल यांची आठवण**

नगरसेवक अक्षय गोरंट्याल यांनी बोलताना माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी दोन वर्षांपूर्वी पत्रकारांसाठी गाळे उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिल्याची आठवण करून दिली. आगामी मनपा सभागृहात हा विषय मांडून नव्याने उभारल्या जाणाऱ्या मनपा कॉम्प्लेक्समध्ये वृत्तपत्रांसाठी गाळे राखीव ठेवण्याचा पाठपुरावा करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. तसेच त्यांनी ‘‘दीपक शेळके यांच्यासारखे ग्राउंड लेव्हलवर काम करणारे पत्रकार समाजातील प्रश्न प्रभावीपणे मांडत आहेत. अशा पत्रकारांच्या पाठीशी आम्ही नेहमीच खंबीरपणे उभे राहू,‘‘ असेही नमूद केले.

**दिवसभर मान्यवरांची रीघ**

सकाळी ११ वाजल्यापासून सायंकाळी ७ वाजेपर्यंत विविध क्षेत्रातील मान्यवर, लोकप्रतिनिधी, पत्रकार, उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते, व्यावसायिक आणि मित्रपरिवार यांनी नूतन कार्यालयाला भेट देत संपादक दीपक शेळके यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

**क्रीडा आणि पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती**

उद्घाटन कार्यक्रमाला महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे सदस्य व टूर्नामेंट कमिटीचे चेअरमन राजू काणे, अभिजीत चव्हाण, भारत बोराडे यांच्यासह अनेक पत्रकार उपस्थित होते. त्यांनी दैनिक युवा आदर्शच्या वाढत्या लोकप्रियतेचे कौतुक करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाला प्रत्यक्ष उपस्थित राहू न शकलेल्या अनेक मान्यवरांनी दूरध्वनीद्वारे शुभेच्छा दिल्या. यामध्ये माजी आमदार कैलास गोरंट्याल, भास्कर दानवे, युवासेनेचे अभिमन्यू खोतकर, धनसिंह सुर्यवंशी, संजय देशमुख, शाम महस्के, आदींचा समावेश होता.या प्रसंगी रविभाऊ राऊत, नगरसेवक दुर्गेश काठोठीवाले, सुनिल नंद, रवी शिंदे, दिनकर घेवंदे, उद्धव केंधळे, भगवान जाधव, आनंद जाधव, विलास तिकांडे, राजेंद्र जाधव, शुभम टेकाळे, अक्षय सोनवणे, विजय जाधव, भरत मानकर, सय्यद सलमान, शंकर शिरगुळे, अक्षय पोलास, वृषभ पोलास, भावेश धारिवाल, जितेंद्र संचेती, राजेश भिसे, सुशीलकुमार वाठोरे, सदानंद देशमुख, सुयोग खर्डेकर, गणेश जाधव, मुन्ना चितोडा, समाधान खरात, राहुल मुळे, विष्णू कदम, आमेर खान, सुनिल भारती, शेख मुजीबुद्दीन, सलीम शेख, आरेफ सय्यद, संतोष भुतेकर, शिवाजी बावणे, अंकुशराव गायकवाड, लियाकत अली खान, जावेद बॅटरीवाले, शेख रुस्तम, मिलिंद सावंत, शेख इलियास, आनंद शिंदे, संदीप भाकरे, मधुसूदन दंडारे, गजानन वीर, दिनेश नंद, नरेंद्र जोगड, कार्तिक मदन, योगेश पिछाडे, राहुल, सलमान, सिद्धेश्वर उबाळे, दर्पण सकलेचा, सुहास वैद्य, नरेश श्रीपत, ओमप्रकाश शिंदे, राम भालेराव, शेख नबी सिपोराकर, सीताराम तुपे, शेख इब्राहिम, लौकीक जांगडे, बदनापूरकर सर, संदीप रोडीया, दत्ता देशमुख, गुंजन शहा, विद्या जाधव, ज्योती आडेकर, निकिता काळे, सतीश जाधव, सागर देवकर, जाहिर शेख (बिल्डर), रमेश राऊत, जगदीश चौंडिये, किशोर गोफणवाड, प्रशांत खंदारे, कैलास फुलारी, भगवान साबळे, वरद मोहिते, बाळासाहेब खेडेकर, मनोज गरदास, परमेश्वर वैद्य, ओम राऊत, पांडुरंग खैरे यांच्यासह असंख्य मित्रपरिवार, हितचिंतक व पत्रकार उपस्थित होते.

या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी दैनिक युवा आदर्शने गेल्या सात वर्षांत निर्भीड, वस्तुनिष्ठ आणि जनहिताची पत्रकारिता करत जालना जिल्ह्यात वेगळी ओळख निर्माण केल्याचे सांगितले. संपादक दीपक शेळके यांच्या नेतृत्वाखाली वृत्तपत्राने समाजातील विविध प्रश्न प्रभावीपणे मांडले असून, भविष्यातही हीच परंपरा कायम ठेवत दैनिक युवा आदर्श अधिक व्यापक स्तरावर यशस्वी वाटचाल करेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.





दैनिक युवा आदर्शच्या कार्यालय स्थलांतर समारंभ प्रसंगी उपस्थित जालनाच्या महापौर वंदनाताई मगरे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करतांना संपादक दीपक शेळके पहिल्या छायाचित्रात. दुसऱ्या छायाचित्रात उपमहापौर राजेश राऊत यांचा तर तिसऱ्या छायाचित्रात नगरसेवक अक्षय गोरंट्याल यांचे स्वागत करतांना संपादक दीपक शेळके.




दैनिक युवा आदर्शच्या कार्यालय स्थलांतर समारंभ प्रसंगी उपस्थित शिवसेना नेते विष्णु पाचफुले यांचे स्वागत करतांना संपादक दीपक शेळके. दुसऱ्या छायाचित्रात अभियंता सय्यद सऊत यांचे स्वागत करतांना दीपक शेळके.




दैनिक युवा आदर्शच्या कार्यालय स्थलांतर समारंभ प्रसंगी संपादक दीपक शेळके यांना शुभेच्छा देतांना महापौर वंदनाताई मगरे, उपमहापौर राजेश राऊत, नगरसेवक अक्षय गोरंट्याल, अभियंता सय्यद सऊत. दुसऱ्या छायाचित्रात कार्यालयाचे उदघाटन करतांना विष्णु पाचफुले व मान्यवर.





दैनिक युवा आदर्शच्या कार्यालय स्थलांतर समारंभ प्रसंगी संपादक दीपक शेळके यांना शुभेच्छा देतांना शिवसेना नेते विष्णु पाचफुले, महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे सदस्य व टूर्नामेंट कमिटीचे चेअरमन राजू काणे, अभिजीत चव्हाण, सुयोग खर्डेकर पहिल्या छायाचित्रात. दुसऱ्या छायाचित्रात मनसेचे रवीभाऊ राऊत, विलास तिकांडे, सतीश जाधव, सागर देवकर, जहिर शेख (बिल्डर), रमेश राऊत, जगदीश चौंडीया. तिसऱ्या छायाचित्रात प्रा. राजेंद्र जाधव, शुभम टेकाळे, दिनकर घेवंदे.






दैनिक युवा आदर्शच्या कार्यालय स्थलांतर समारंभ प्रसंगी संपादक दीपक शेळके यांना शुभेच्छा देतांना पहिल्या छायाचित्रात नगरसेवक दुर्गेश काठोटीवाले, सुनील नंद. दुसऱ्या छायाचित्रात सुयोग खर्डेकर, गणेश जाधव, शिवाजी बावणे, राहुल मुळे. तिसऱ्या छायाचित्रात भावेश धारीवाल, जितेंद्र संचेती. चौथ्या छायाचित्रात शेख रुस्तम.

### अजय आढाव हत्या प्रकरणाने उघडे पाडले पोलिसांच्या कार्यपद्धतीवरील प्रश्नचिन्ह

# पहिल्या हल्ल्यानंतरही आरोपी मोकाट, अखेर भररस्त्यात हत्या

### कुटुंबीयांचा संताप; पोलिस निरीक्षक जे. बी. शेवाळे यांच्या निलंबनाची मागणी, पोलीस अधीक्षकांकडून विभागीय चौकशीचे आदेश

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील २५ वर्षीय अजय विक्रम आढाव यांच्या निर्घृण हत्येनंतर केवळ आरोपींच्याच नव्हे, तर पोलिसांच्या कार्यपद्धतीवरही गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. उपलब्ध प्रथम माहिती अहवालानुसार, २ ऑगस्ट रोजी अजयवर जीवघेणा हल्ला झाल्यानंतर त्याने तक्रार दिली होती. त्यानंतरही त्याला सातत्याने जीवे मारण्याच्या धमक्या मिळत राहिल्या आणि अखेर ६ ऑगस्ट रोजी भररस्त्यात चाकूहल्ला करून त्याची हत्या करण्यात आली, असा आरोप करण्यात आला आहे. या घटनाक्रमामुळे वेळेत प्रतिबंधात्मक उपाययोजना झाल्या असत्या तर ही घटना टाळता आली असती का, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. दरम्यान, या प्रकरणातील जनक्षोभ लक्षात घेऊन जिल्हा पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू यांनी कदीम जालना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जे. बी. शेवाळे यांच्या कामकाजाची विभागीय चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. चौकशी अहवालानंतर आवश्यक प्रशासकीय कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

**पहिल्या हल्ल्यानंतरही प्रभावी कारवाई झाली का?**

प्रथम माहिती अहवालानुसार, २ ऑगस्ट रोजी अजय आढाव आणि त्याचा मित्र बंटी म्हस्के यांच्यावर लोखंडी रॉड आणि लाथाबुक्क्यांनी हल्ला करण्यात आला होता. या हल्ल्यात अजय गंभीर जखमी झाला होता. उपचारानंतर त्याच्या जबाबावरून ५ ऑगस्ट रोजी कदीम जालना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

फिर्यादीच्या आरोपानुसार, गुन्हा दाखल झाल्यानंतरही आरोपींकडून अजयचा पाठलाग, धमक्या आणि दबाव सुरूच होता. या पार्श्वभूमीवर आरोपींवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली होती का, त्यांच्यावर देखरेख ठेवण्यात आली होती का, तसेच पीडिताला संरक्षण देण्याबाबत कोणती पावले उचलली गेली, असे प्रश्न आता चर्चेत आले आहेत.

इन्स्टाग्राम लाइव्हमधील कथित धमकीची दखल का घेतली गेली नाही?

या प्रकरणातील सर्वात गंभीर बाब म्हणजे आरोपींपैकी एकाने इन्स्टाग्रामवरील थेट प्रक्षेपणादरम्यान ''अब तो तू खत्म'' अशी उघड धमकी दिल्याचा उल्लेख प्रथम माहिती अहवालात करण्यात आला आहे. जर ही बाब तपासात सिद्ध झाली, तर अशा स्वरूपाच्या सार्वजनिक धमकीची वेळेत दखल घेण्यात आली का, त्याबाबत सायबर अथवा स्थानिक पोलिसांनी कोणती कारवाई केली का, असे प्रश्नही उपस्थित होत आहेत. मात्र, या बाबींची सत्यता तपासाच्या निष्कर्षांवर अवलंबून असेल.

**सहा आरोपींवर गंभीर गुन्हे**

या प्रकरणात अनिकेत राऊत, शोएब शेख, शादाब शेख, अझहर सय्यद ऊर्फ कल्लू, तौफीक शेख ऊर्फ मुल्ल्या आणि जुबेर या सहा जणांविरुद्ध भारतीय न्याय संहितेतील खून, खुनाचा प्रयत्न, बेकायदेशीर जमाव, धमकी तसेच अनुसूचित जाती-जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियमांतर्गत विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**कुटुंबीयांची आक्रमक भूमिका**

अजयच्या मृत्यूनंतर जिल्हा सामान्य रुग्णालय परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. आरोपींना तातडीने अटक करावी आणि संबंधित पोलीस निरीक्षकांवर कारवाई करावी, या मागणीवर कुटुंबीय ठाम राहिले. मागण्या मान्य होईपर्यंत अंत्यसंस्कार न करण्याची भूमिका त्यांनी घेतली होती.

वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी निष्पक्ष तपासाचे आश्वासन दिल्यानंतरच कुटुंबीयांनी अंत्यसंस्कारास संमती दिली.

**पोलीस अधीक्षकांची भूमिका**

प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन जिल्हा पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू यांनी माध्यमांशी बोलताना, पोलीस निरीक्षक जे. बी. शेवाळे यांच्या कामकाजाची विभागीय चौकशी करण्यात येईल असे स्पष्ट केले. चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार आवश्यक प्रशासकीय निर्णय घेतला जाईल, असेही त्यांनी सांगितले.

तसेच, हत्येचा तपास निष्पक्ष, सखोल आणि जलदगतीने करण्याचे निर्देश तपास पथकाला देण्यात आले असून, दोषी आढळणाऱ्या कोणालाही कायद्यात कोणतीही सवलत दिली जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

पोलिसांकडून घटनास्थळावरील पुरावे, सीसीटीव्ही फुटेज, प्रत्यक्षदर्शींचे जबाब, मोबाईल कॉल रेकॉर्ड, तसेच समाजमाध्यमांवरील कथित धमकीसंदर्भातील इलेक्ट्रॉनिक पुराव्यांची तपासणी सुरू आहे. या सर्व पुराव्यांच्या आधारे पुढील तपासाची दिशा निश्चित केली जाणार आहे.

**अनुत्तरित प्रश्नांची चौकशी आवश्यक**

या प्रकरणामुळे काही महत्त्वाचे प्रश्न निर्माण झाले आहेत. २ ऑगस्टच्या हल्ल्यानंतर आरोपींविरुद्ध कोणती प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली? पीडिताला संरक्षण देण्याची आवश्यकता होती का? कथित सोशल मीडिया धमकीची वेळेत दखल घेण्यात आली का? पहिल्या गुन्ह्यानंतर आरोपी पुन्हा हिंसक कृत्य करू नयेत यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली? या प्रश्नांची उत्तरे विभागीय चौकशी आणि गुन्ह्याच्या तपासातून स्पष्ट होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

या प्रकरणाचा निष्पक्ष तपास करून दोषींना कठोर शिक्षा व्हावी, तसेच पोलिसांच्या कार्यपद्धतीत काही त्रुटी आढळल्यास संबंधितांवरही नियमानुसार कारवाई व्हावी, अशी मागणी नागरिक आणि विविध सामाजिक संघटनांकडून होत आहे.

**निष्पक्ष विभागीय चौकशी साठी पोलिस निरीक्षक यांचा पदभार काढा...**

अजय आढाव हत्या प्रकरणात पोलीस निरीक्षकांच्या कामकाजाची विभागीय चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मात्र, चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित पोलीस निरीक्षकांकडून त्या पदाचा कार्यभार तात्पुरता काढून घेण्याची मागणी जोर धरत आहे. कायद्याच्या दृष्टीने चौकशीचा उद्देश दोष निश्चित करणे नसून वस्तुस्थिती निष्पक्षपणे समोर आणणे हा असतो. त्यामुळे चौकशीवर कोणत्याही प्रकारचा प्रभाव पडू नये, साक्षीदारांवर दबाव येऊ नये, कागदपत्रे किंवा पुराव्यांबाबत संशय निर्माण होऊ नये आणि जनतेचा चौकशी प्रक्रियेवरील विश्वास कायम राहावा, यासाठी चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित अधिकाऱ्यांना प्रशासकीयदृष्ट्या बाजूला करण्याची पद्धत अनेक प्रकरणांत अवलंबली जाते. अंतिम दोष किंवा निर्दोषत्वाचा निर्णय चौकशीनंतरच होणार असला, तरी ''निष्पक्ष चौकशी केवळ झाली पाहिजे असे नाही, तर ती होत असल्याचेही जनतेला दिसले पाहिजे,'' हा न्यायव्यवस्थेतील मूलभूत सिद्धांत मानला जातो. त्यामुळे या प्रकरणातही विभागीय चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित पोलीस निरीक्षकांचा पदभार तात्पुरता काढून घेण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

---

## जालना जिल्ह्यात मराठा-कुणबी प्रमाणपत्रासाठी दोन दिवसांचे विशेष शिबिर

### महसूल मंडळनिहाय शिबिरांचे आयोजन; पात्र मराठा नागरिकांना गावपातळीवरच अर्ज करण्याची सुविधा

**जालना । प्रतिनिधी**

मराठा समाजातील पात्र नागरिकांना कुणबी प्रमाणपत्र मिळविण्याची प्रक्रिया अधिक सुलभ आणि गतिमान करण्यासाठी जालना जिल्हा प्रशासनाने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. जिल्ह्यातील प्रत्येक महसूल मंडळांतर्गत ग्रामपंचायत स्तरावर दोन दिवसांचे विशेष शिबिर आयोजित करण्यात येणार असून, या शिबिरांमध्ये पात्र नागरिकांकडून कुणबी प्रमाणपत्रासाठी अर्ज स्वीकारले



जाणार आहेत. महसूल विभागाचे अधिकारी प्रत्यक्ष गावात उपस्थित राहून अर्ज स्वीकारणार असल्याने नागरिकांना तहसील किंवा इतर महसूल कार्यालयांच्या फेऱ्या मारण्याची गरज भासणार नाही.

ही कार्यवाही मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी केलेल्या मागणीच्या पार्श्वभूमीवर सुरू करण्यात आली आहे. हैदराबाद गॅझेटिअरमधील नोंदींच्या आधारे पात्र मराठा समाजातील व्यक्तींना कुणबी प्रमाणपत्र देण्यात यावे आणि त्यासाठी गावपातळीवर विशेष शिबिरे भरवावीत, अशी मागणी त्यांनी सातत्याने शासनाकडे केली होती. शासनाने या मागणीची दखल घेत राज्यभर विशेष मोहीम राबविण्याचे निर्देश दिल्यानंतर जालना जिल्ह्यातही या उपक्रमाची अंमलबजावणी सुरू झाली आहे.

*(पान ३ वर)*

---

## सीसीएमपी पात्र होमिओपॅथिक डॉक्टरांना एमएमसी नोंदणीचा मार्ग मोकळा; जालन्यात डॉक्टरांचा जल्लोष

### राज्य शासनाच्या निर्णयाचे अंबड चौफुलीवर उत्स्फूर्त स्वागत

**जालना । प्रतिनिधी**

राज्य शासनाने ३ ऑगस्ट रोजी जारी केलेल्या शासन निर्णयामुळे सर्टिफिकेट कोर्स इन मॉडर्न फार्माकॉलॉजी () उत्तीर्ण बीएचएमएस (होमिओपॅथी) डॉक्टरांना महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल () मध्ये स्वतंत्र नोंदणीचा मार्ग मोकळा झाल्यानंतर जालना शहरातील होमिओपॅथिक डॉक्टरांनी शुक्रवारी अंबड चौफुली येथे उत्स्फूर्त जल्लोष साजरा केला. फटाक्यांची



आतषबाजी, गुलालाची उधळण आणि पेढे वाटून डॉक्टरांनी शासनाच्या निर्णयाचे स्वागत केले.

अंबड चौफुली येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारक परिसरात जिल्ह्यातील मोठ्या संख्येने होमिओपॅथिक डॉक्टर, वैद्यकीय क्षेत्राशी संबंधित मान्यवर तसेच गुरु मिश्री होमिओपॅथिक मेडिकल कॉलेजचे विद्यार्थी एकत्र आले होते. शासन निर्णय जाहीर झाल्यानंतर डॉक्टरांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मागणीला अखेर न्याय मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

**दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या मागणीला मिळाला दिलासा**

*(पान ३ वर)*

---

## जालन्यात अवैध कत्तलखान्यावर चंदनझिरा पोलिसांचा धडाका; ५ गौवंशांची सुटका, १३६ किलो गौमांस जप्त

### नॅशनलनगर परिसरात छापा; तीन जण ताब्यात, १ लाख ७७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील नॅशनलनगर परिसरात अवैधरित्या सुरू असलेल्या कथित कत्तलखान्यावर चंदनझिरा पोलिसांनी शुक्रवारी (७ ऑगस्ट) धडक कारवाई करत १३६ किलो गौमांस, कत्तलीचे साहित्य आणि कत्तलीसाठी बांधून ठेवण्यात आलेल्या पाच गौवंशीय जनावरांची सुटका केली. या कारवाईत एकूण १ लाख ७७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून तीन संशयितांना ताब्यात घेण्यात आले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नॅशनलनगर (गुलशननगर) परिसरातील एका पत्र्याच्या शेडमध्ये अवैधरित्या गौवंशीय जनावरांची कत्तल करून गौमांस विक्रीसाठी पाठविले जात असल्याची गुप्त माहिती चंदनझिरा पोलिसांना मिळाली होती. या माहितीची खातरजमा केल्यानंतर पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथकाने संबंधित ठिकाणी छापा टाकला.

छाप्यादरम्यान काही व्यक्ती गौवंशीय जनावरांची कत्तल करत असल्याचे पोलिसांना आढळून आले. घटनास्थळाची तपासणी केली असता १३६ किलो गौमांस, कत्तलीसाठी वापरण्यात येणारे साहित्य तसेच इतर सामग्री जप्त करण्यात आली.

*(पान ३ वर)*

---

## जालना महानगरपालिकेचा वर्धापन दिन विविध विकासाभिमुख उपक्रमांनी उत्साहात साजरा

### 'व्हिजन जालना' चित्रफीत आणि नवीन बोधचिन्हाचे अनावरण

**जालना । प्रतिनिधी**

जालना महानगरपालिकेचा वर्धापन दिन शहराच्या सर्वांगीण विकासाची दिशा अधोरेखित करणाऱ्या विविध उपक्रमांनी गुरुवारी उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. पर्यावरण संवर्धन, आरोग्य, तंत्रज्ञानाचा वापर, कर्मचारी सन्मान, महिला सक्षमीकरण आणि भविष्यातील विकास आराखड्याचे सादरीकरण अशा विविध उपक्रमांचा समावेश असलेल्या कार्यक्रमामुळे हा वर्धापन दिन विशेष ठरला. या कार्यक्रमात शहराच्या भविष्यातील विकासाचे चित्र मांडणारी व्हिजन जालना ही विशेष चित्रफीत सादर करण्यात आली, तसेच जालना महानगरपालिकेच्या नवीन बोधचिन्हाचे (लोगो) अनावरण करण्यात आले.



महापौर वंदना अरुण मगरे, उपमहापौर राजेश राऊत, स्थायी समिती सभापती अशोक पांगारकर आणि महानगरपालिका आयुक्त अंजली शर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. यावेळी महापालिकेचे पदाधिकारी, नगरसेवक, अधिकारी, कर्मचारी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

**वृक्षारोपणाने कार्यक्रमाची सुरुवात**

वर्धापन दिनानिमित्त सकाळी ८.३० वाजता वृक्षारोपण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. पर्यावरण संरक्षण आणि हरित जालना या संकल्पनेला बळ देण्याच्या उद्देशाने मान्यवरांच्या हस्ते विविध वृक्षांची लागवड करण्यात आली. शहरातील हरित क्षेत्र वाढविण्यासाठी नागरिकांनीही वृक्षसंवर्धनात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

**ड्रोनच्या साहाय्याने जीआयएस**

*(पान ३ वर)*

---

## जालन्यात तीन वर्षांच्या चिमुकलीवरील लैंगिक अत्याचार प्रकरणात अवघ्या ५७ दिवसांत निकाल

### आरोपीला नैसर्गिक जीवनाच्या अखेरपर्यंत जन्मठेप

**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील तीन वर्षांच्या चिमुकलीवरील लैंगिक अत्याचाराच्या अत्यंत संवेदनशील आणि गंभीर प्रकरणात विशेष जिल्हा व सत्र न्यायालयाने कठोर निर्णय देत आरोपीला त्याच्या नैसर्गिक जीवनाच्या अखेरपर्यंत जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. तसेच ५० हजार रुपयांचा दंड ठोठावत, दंडाची रक्कम न भरल्यास सहा महिन्यांच्या सक्तमजुरीची अतिरिक्त शिक्षा सुनावण्यात आली आहे. याशिवाय महाराष्ट्र शासनाच्या मनोधैर्य योजनेअंतर्गत पीडित चिमुकलीला ३ लाख रुपयांची भरपाई देण्याचे आदेशही न्यायालयाने दिले आहेत.



विशेष जिल्हा व सत्र न्यायाधीश कृपेश विजय मोरे यांच्या न्यायालयाने ६ ऑगस्ट २०२६ रोजी हा निकाल दिला. या प्रकरणाचे वैशिष्ट्य म्हणजे गुन्हा दाखल झाल्यानंतर अवघ्या ५७ दिवसांत तपास, सुनावणी आणि अंतिम निकाल पूर्ण झाला. अल्पावधीत न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण झाल्याने या निकालाकडे कायदा क्षेत्रासह सर्वसामान्य नागरिकांचेही लक्ष लागले होते.

घरासमोर खेळत असलेल्या चिमुकलीला दुचाकीवरून नेल्याचा आरोप न्यायालयीन कागदपत्रांनुसार, पीडित तीन वर्षीय मुलगी घराजवळ खेळत असताना आरोपी अजय संतोष विटोरे (वय २९, रा. गोंदेश्वर मंदिराजवळ, म्हारावाडा/गोंदी, ता. अंबड, जि. जालना) याने तिला दुचाकीवरून नेल्याचा आरोप होता. त्यानंतर तिच्यावर लैंगिक अत्याचार करण्यात आल्याचा गुन्हा नोंदविण्यात आला. दरम्यान, मुलगी बराच वेळ दिसत नसल्याने कुटुंबीयांनी तिचा शोध सुरू केला. शोध घेत असताना आरोपी मुलीला घेऊन येताना दिसल्याचे तपासात समोर आले. मुलीची प्रकृती आणि अवस्था संशयास्पद वाटल्याने कुटुंबीयांनी तिला तातडीने रुग्णालयात दाखल केले.

**वैद्यकीय तपासणीत दुखापतींची नोंद**

वैद्यकीय तपासणीत पीडित मुलीच्या शरीरावर दुखापतींच्या खुणा आढळून आल्या. त्यानंतर सदर बाजार पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध संबंधित कायद्यांखाली गुन्हा दाखल करण्यात आला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तत्काळ तपासाला गती दिली.

**विशेष तपास पथकाची स्थापना**

प्रकरणाची संवेदनशीलता लक्षात घेऊन पोलिसांनी विशेष तपास पथकाची स्थापना केली. तपास अधिकाऱ्यांनी घटनास्थळावरील पुरावे, वैद्यकीय अहवाल, साक्षीदारांचे जबाब आणि इतर तांत्रिक पुरावे अल्पावधीत संकलित केले. आवश्यक पुरावे गोळा करून आरोपीविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

तपास जलदगतीने पूर्ण झाल्यामुळे न्यायालयीन प्रक्रियेलाही वेग मिळाला आणि अवघ्या ५७ दिवसांत प्रकरणाचा निकाल लागला.

**न्यायालयाचा कठोर संदेश**

विशेष न्यायालयाने उपलब्ध पुरावे, साक्षी आणि वैद्यकीय अहवालांचा विचार करून आरोपीला दोषी ठरविले. त्यानुसार त्याला नैसर्गिक जीवनाच्या अखेरपर्यंत जन्मठेप, ५० हजार रुपयांचा दंड, तसेच दंड न भरल्यास सहा महिन्यांची सक्तमजुरी अशी शिक्षा सुनावण्यात आली.

*(पान ३ वर)*

---

## चिखलामुळे स्कुटीस्वार महिला घसरून पडली

### गैरसमजतीतून संतप्त अज्ञातांचा एसटीवर हल्ला

**जालना - प्रतिनिधी**

शहरात एका गैरसमजातून एसटी बसवर दगडफेक करण्यात आल्याची घटना घडली आहे. चिखलामुळे स्कुटीस्वार महिला घसरून पडल्याचा अपघात एसटी बसच्या धडकेमुळे झाल्याचा समज झाल्याने काही अज्ञातांनी बसवर दगडफेक करून काचा फोडल्या. मात्र, महिलेला एसटीचा कोणताही धक्का लागला नसल्याचे बस वाहकांनी स्पष्ट केले आहे. या प्रकरणी कदीम जालना पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध तक्रार दाखल करण्यात आली आहे आहे.

काल गुरुवार रोजी संध्याकाळी जालना बसस्थानकातून पैठणकडे जाणारी एमएच-२० बीएल-२०१४ क्रमांकाची एसटी बस शहरातून पुढे जात असताना एका पेट्रोल पंपाजवळ ही घटना घडली. पावसामुळे रस्त्यावर चिखल झाल्याने समोरून जाणारी स्कुटीस्वार महिला घसरून रस्त्यावर पडली. तिच्या काही अंतरावरच एसटी बस येत होती. महिला पडल्याचे पाहताच चालकाने प्रसंगावधान राखत बस तत्काळ थांबवली. मात्र, आजूबाजूला उपस्थित काही नागरिकांना एसटी बसच्या धडकेमुळे महिला पडल्याचा गैरसमज झाला. या गैरसमजातून काही अज्ञातांनी संतापाच्या भरात एसटी बसवर दगडफेक केली. या दगडफेकीत बसच्या काचा फुटल्या आणि एसटीचे नुकसान झाले.

घटनेची माहिती मिळताच कदीम जालना पोलीस

*(पान ३ वर)*

# भारतीय शिक्षणव्यवस्थेचे भयाण वास्तव की पालकांच्या मानसिकतेचा बदलता आरसा

माणसाचा जन्मच समस्यातून झालेला असतो. त्यामुळे माणूस म्हटलं की समस्या असणारच. माणूस आणि समस्यांचे नाते अतूट आहे. जोपर्यंत जीवन आहे, तोपर्यंत लहान-मोठ्या अडचणी आणि संघर्ष माणसाच्या मागे असतातच. ही एक नैसर्गिक आणि अटळ बाब आहे, जिथे प्रत्येक व्यक्तीला कधी ना कधी वेगवेगळ्या आव्हानांचा सामना करावाच लागतो. जगात कितीही समस्या किंवा प्रश्न असले, तरी त्या सर्वांची उत्तरे शिक्षणामध्येच दडलेली आहेत. शिक्षण हीच सर्व प्रकारच्या विकासाची गुरुकिल्ली आहे. त्यामुळे शिक्षण क्षेत्रात त्यादिशेने काम करणे अत्यंत आवश्यक आहे. समाजात आई-वडिलांना देवाचे स्थान दिले जाते. आई-वडिलांएवढेच श्रेष्ठ स्थान कोणाचे असेल, तर ते गुरुजनांचे आहे. प्रत्येक माणसामध्ये अथांग शक्यता, क्षमता असतात. गुरु या बीजरूपी शक्तीला अंकुरित करतात. माणसाला अनेकदा स्वतःमधील शक्तीची जाणीव नसते. गुरु त्याच्या मनात ती जाणीव निर्माण करतात आणि त्याला आत्मविश्वास देतात. आत्मविश्वासाशिवाय आयुष्यात काहीही करू शकत नाही. ज्या समाजात शिक्षकांना आणि गुरुजनांना योग्य मान-सन्मान दिला जातो, तोच समाज प्रगतिशील बनतो आणि पुढे जातो. उत्तम शिक्षण माणसाला केवळ नोकरी शोधणारा नाही, तर नोकरी देणारा आत्मनिर्भर बनविते. शिक्षण हे ओझे नव्हे, आनंद असावा. मुलांवर अभ्यासाचे ओझे न लादता शिक्षण हा आनंददायी प्रवास बनविला पाहिजे. करिअरमध्ये यशस्वी होण्यासाठी पाठांतरापेक्षा स्वतःच्या आवडीच्या क्षेत्रावर लक्ष केंद्रित करायला पाहिजे. पण देशातील शिक्षण व्यवस्थेचे धक्कादायक वास्तव निती आयोगाच्या अहवालातून समोर आले आहेत. त्यामुळे भारतातील शालेय शिक्षण व्यवस्थेसमोर दोन मोठी आव्हाने उभी ठाकली आहेत. एकीकडे प्राथमिक शिक्षणात प्रवेश घेणा-या प्रत्येक दहा विद्यार्थ्यांपैकी सुमारे चार विद्यार्थी बारावीपर्यंत पोहोचत नाहीत, तर दुसरीकडे २०१७-१८ ते २०२२-२३ या पाच वर्षांत देशातील शाळांची संख्या सुमारे ९२ हजारांनी कमी झाली आहे. याहून धक्कादायक म्हणजे, एक लाखांहून अधिक शाळा एक शिक्षकी तर ७,९९३ शाळांमध्ये एकही विद्यार्थी नाही. विद्यार्थी संख्येमुळे शाळांची संख्या कमी झाली नसून कमी पटसंख्येच्या शाळांचे विलीनीकरण, शाळांचे पुनर्गठन आणि एकात्मिक शाळा उभारण्याच्या धोरणामुळे झाली असल्याचे निती आयोगाच्या शालेय शिक्षणावरील अहवालात नमूद करण्यात आले आहे. देशात आज १४.७१ लाख शाळांमध्ये २४.६९ कोटींहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. प्राथमिक स्तरावर शिक्षणाची उपलब्धता मोठ्या प्रमाणात वाढली असली, तरी माध्यमिक आणि विशेषतः उच्च माध्यमिक स्तरावर विद्यार्थ्यांना टिकवून ठेवणे ही शिक्षण व्यवस्थेची सर्वात मोठी कसोटी ठरत आहे. प्राथमिक स्तरावरील एकूण प्रवेश प्रमाण ९०.९ टक्के आहे. मात्र उच्च माध्यमिक स्तरावर हे प्रमाण थेट ५८.४ टक्क्यांवर घसरते. म्हणजेच प्राथमिक शिक्षणात प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांपैकी सुमारे ४० टक्के विद्यार्थी बारावीपर्यंत पोहोचत नाहीत. विद्यार्थी गळतीचे मुख्य कारण म्हणजे माध्यमिक शिक्षणाचा खर्च प्राथमिक शिक्षणापेक्षा तीन ते पाच पट अधिक आहे. शिक्षणाचा हक्क कायद्याचा लाभ माध्यमिक शिक्षणाला नसल्याने पालकांना शुल्क, परीक्षा शुल्क, प्रवास आणि इतर खर्च करावा लागतो. याशिवाय, शाळेबाहेर असलेल्या किशोरवयीन मुलांपैकी ३१ टक्के रोजगारात आहेत. २५ टक्के घरगुती जबाबदा-या सांभाळतात. मुलींमध्ये अल्पवयीन विवाह आणि स्वच्छता सुविधांचा अभाव हीही गळतीची कारणे आहेत. देशाच्या तुलनेत महाराष्ट्राचे चित्र काय सांगते? उच्च प्राथमिक ते माध्यमिक स्तरावर विद्यार्थ्यांचे संक्रमण प्रमाण ९८.४ टक्के असून ते देशातील सर्वोत्तम राज्यांपैकी एक आहे. म्हणजेच आठवीपासून दहावीपर्यंत विद्यार्थी टिकवून ठेवण्यात महाराष्ट्राची कामगिरी चांगली आहे. मात्र, दुसरीकडे माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरावर शिक्षक-विद्यार्थी गुणोत्तर ३७:१ आहे. राष्ट्रीय निकषांच्या तुलनेत हे प्रमाण जास्त मानले जाते. देशातील शाळांची रचना असमतोल असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. एकतृतीयांशपेक्षा अधिक शाळांमध्ये ५० पेक्षा कमी विद्यार्थी आहेत. त्यामुळे शाळा कमी झाल्या आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतच्या एकात्मिक शाळा व शाळा समूह उभारण्याची शिफारस करण्यात आली आहे. यामुळे विज्ञान प्रयोगशाळा, वाचनालय, संगणक सुविधा व विषयतज्ज्ञ शिक्षक सर्व विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्याचा उद्देश आहे. ज्या शाळांमध्ये विद्यार्थी शिकत आहेत, त्या शाळांचा दर्जा काय आहे? या प्रश्नाचे उत्तर शोधल्याशिवाय भारतीय शिक्षणव्यवस्थेचे खरे चित्र समोर येणार नाही. भारतातील शिक्षणव्यवस्थेची चर्चा झाली की आपण प्रवेशदर, गळती, शिक्षकांची संख्या आणि नवीन शाळा या आकडेवारीवर भर देतो. केंद्र सरकारने प्रसिद्ध केलेल्या युडाईज २०२५-२६ अहवालातही अशीच अनेक सकारात्मक चित्रे दिसतात. शाळाबाह्य विद्यार्थ्यांची संख्या कमी झाली आहे, शिक्षक-विद्यार्थी गुणोत्तर सुधारले आहे, डिजिटल सुविधा वाढल्या आहेत आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० योग्य दिशेने जात असल्याचे चित्र समोर येते; पण या अहवालात दडलेला एक आकडा मात्र गंभीर विचार करायला भाग पाडतो. गेल्या दोन वर्षांत सरकारी शाळांमधून तब्बल ८६ लाख विद्यार्थी कमी झाले, तर जवळपास तेवढेच विद्यार्थी खासगी शाळांकडे वळले. ही केवळ आकडेवारी नाही; हा भारतीय पालकांच्या बदलत्या मानसिकतेचा आरसा आहे. आज बहुतेक पालकांची एक अशी धारणा झाली आहे की, 'मुलाचे भविष्य घडवायचे असेल तर खाजगी शाळाच हवी.' ही धारणा पूर्णपणे खरी आहे की नाही, यावर मतभेद असू शकतात; पण ही धारणा तयार झाली आहे, हे नाकारता येत नाही. विशेष म्हणजे, ही केवळ श्रीमंत कुटुंबांची निवड राहिलेली नाही. ग्रामीण भागातील, शेतकरी, कामगार आणि निम्न मध्यमवर्गीय कुटुंबेही मोठ्या आर्थिक त्यागाने मुलांना खाजगी शाळेत पाठवत आहेत. कारण त्यांना वाटते की, शिक्षण हा खर्च नाही; तर मुलांच्या भविष्याची गुंतवणूक आहे. याचवेळी युडाईज अहवालातील आणखी काही आकडे आपल्याला अस्वस्थ करतात. प्राथमिक शिक्षणात प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांपैकी केवळ ५१.९ टक्के विद्यार्थी बारावीपर्यंत पोहोचतात, तर माध्यमिक शिक्षणाचा सकल प्रवेशदर अजूनही ७१.७ टक्के आहे. म्हणजेच, लाखो विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवासात मधेच मागे पडतात. भारताने मुलांना शाळेत आणण्यात मोठे यश मिळवले आहे; पण त्यांना दर्जेदार शिक्षण देऊन शेवटपर्यंत टिकवून ठेवण्यात अजूनही मोठी तफावत आहे. गेल्या तीन दशकांत शिक्षणाचा हक्क कायदा, सर्वशिक्षा अभियान, मध्यान्ह भोजन योजना आणि समग्र शिक्षा यांसारख्या योजनांमुळे प्राथमिक शिक्षण सर्वांपर्यंत पोहोचले. त्यामुळे आजचा प्रश्न 'मुलांना शाळेत कसे आणायचे?' हा राहिलेला नाही.

आजचा खरा प्रश्न आहे, 'शाळेत येणा-या प्रत्येक मुलाला गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळते का?' कारण शाळेत प्रवेश मिळणे आणि चांगले शिक्षण मिळणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. याच ठिकाणी अहवालाची मर्यादा दिसून येते. हा अहवाल शाळांची संख्या, शिक्षक, संगणक, इंटरनेट, प्रयोगशाळा आणि इतर सुविधा यांचे उत्कृष्ट चित्र मांडतो; पण विद्यार्थी किती समजून शिकतो? त्याच्यात चिकित्सक विचार विकसित होतो का? वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होतो का? रोजगारासाठी आवश्यक कौशल्ये मिळतात का? या प्रश्नांची उत्तरे देत नाही. त्यामुळे हा अहवाल शिक्षणव्यवस्थेच्या प्रशासकीय स्थितीचे मोजमाप करतो; शिक्षणाच्या गुणवत्तेचे नाही. सरकारी शाळांची संख्या कमी होण्यामागे शाळांचे एकत्रीकरण हेही एक कारण सांगितले जाते. संसाधनांचा कार्यक्षम वापर हा त्यामागील उद्देश असला, तरी ग्रामीण आणि दुर्गम भागात त्याचे वेगळे परिणाम होतात. गावातील शाळा बंद झाली की, लहान मुलांना अधिक अंतर पार करावे लागते. अनेक मुलींसाठी हेच अंतर शिक्षण सोडण्याचे कारण ठरते. त्यामुळे शाळांचे नियोजन करताना केवळ खर्चाचा विचार पुरेसा नाही; सामाजिक परिणामांचा विचारही तितकाच आवश्यक आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० ने कौशल्याधारित, अनुभवाधारित आणि विद्यार्थीकेंद्रित शिक्षणाची दिशा दिली आहे. परंतु कोणतेही धोरण कागदावर यशस्वी ठरत नाही; ते विद्यार्थ्यांच्या आयुष्यात बदल घडवते तेव्हाच त्याचे यश सिद्ध होते.

म्हणूनच शिक्षणाचे मूल्यांकन केवळ प्रवेशदर, गळती किंवा पायाभूत सुविधांवर न करता विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या गुणवत्तेवर, रोजगारक्षमतेवर आणि व्यक्तिमत्त्व विकासावर झाले पाहिजे. आज भारतीय शिक्षणव्यवस्थेसमोरचा सर्वांत मोठा प्रश्न 'सरकारी शाळा किती आहेत?' हा नाही; तर 'सरकारी शाळांवर समाजाचा विश्वास किती आहे?' या अहवालाने आपल्यासमोर एक कठोर वास्तवही ठेवले आहे.

सरकारी शाळांमधून लाखो विद्यार्थी बाहेर पडत आहेत. त्यामुळे आजचा सर्वांत महत्त्वाचा प्रश्न हा नाही की किती विद्यार्थी शाळेत आहेत? तर तो हा आहे की, ज्या शाळांमध्ये विद्यार्थी आहेत, त्या शाळांवर पालकांचा विश्वास अजूनही टिकून आहे का? या प्रश्नाचे उत्तर शोधल्याशिवाय भारतीय शिक्षणव्यवस्थेचे खरे चित्र समोर येणार नाही.

**सुनील शिरपुरे**
**कमळवेल्ली,यवतमाळ**
**भ्रमणध्वनी-७४९८८८५०६१**

---

**पान २ वरुन...**

## जालना जिल्ह्यात...

ग्रामपंचायत कार्यालयातच अर्ज स्वीकारले जाणार

जिल्ह्यातील प्रत्येक महसूल मंडळाच्या कार्यक्षेत्रातील संबंधित ग्रामपंचायत कार्यालयात हे शिबिर होणार आहे. शिबिरादरम्यान महसूल विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित राहून नागरिकांना आवश्यक मार्गदर्शन करतील तसेच कुणबी प्रमाणपत्रासाठी आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करून अर्ज स्वीकारतील. त्यामुळे अर्ज प्रक्रियेत पारदर्शकता वाढण्यासोबतच नागरिकांचा वेळ आणि खर्चही वाचणार आहे. कुणबी प्रमाणपत्रासाठी मोठ्या प्रमाणावर अर्ज प्रलंबित असल्याच्या पार्श्वभूमीवर गावपातळीवरच अर्ज स्वीकारण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यामुळे पात्र नागरिकांना सुलभ पद्धतीने अर्ज करता येणार असून प्रमाणपत्र वितरण प्रक्रियेलाही वेग मिळेल, अशी अपेक्षा महसूल विभागाकडून व्यक्त करण्यात येत आहे.

महसूल प्रशासनाने मराठा समाजातील पात्र नागरिकांना या विशेष शिबिरांचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. आवश्यक कागदपत्रांसह संबंधित ग्रामपंचायत कार्यालयात उपस्थित राहून नियमानुसार अर्ज सादर करावेत, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

महसूल विभागाकडून विशेष नियोजन

शिबिरे सुरळीत पार पडावीत यासाठी महसूल विभागाने मंडळ अधिकारी, तलाठी आणि संबंधित कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या आहेत. अर्ज स्वीकारणे, कागदपत्रांची प्राथमिक पडताळणी करणे आणि पात्र अर्ज पुढील प्रक्रियेसाठी तत्काळ पाठविणे, अशा स्वरूपाचे नियोजन करण्यात आले आहे.

या विशेष उपक्रमामुळे मराठा-कुणबी प्रमाणपत्रासाठीची प्रक्रिया अधिक सुलभ होऊन पात्र नागरिकांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## सीसीएमपी पात्र...

सीसीएमपी पात्र होमिओपॅथिक डॉक्टरांच्या महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलमधील नोंदणीचा प्रश्न अनेक वर्षांपासून चर्चेत होता. या संदर्भात विविध होमिओपॅथिक संघटना, डॉक्टर आणि वैद्यकीय क्षेत्रातील प्रतिनिधींनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. अखेर राज्य शासनाने ३ ऑगस्ट रोजी शासन निर्णय जारी करून पात्र डॉक्टरांना एमएमसीमध्ये नोंदणीचा मार्ग उपलब्ध करून दिला आहे.

या निर्णयामुळे सीसीएमपी पात्र डॉक्टरांना त्यांच्या व्यावसायिक कामकाजात अधिक स्पष्टता मिळणार असून, वैधानिक प्रक्रियेलाही बळ मिळेल, असा विश्वास डॉक्टरांनी व्यक्त केला.

**अंबड चौफुलीवर आनंदोत्सव**

शासन निर्णयाचे स्वागत करण्यासाठी आयोजित कार्यक्रमात उपस्थित डॉक्टरांनी घोषणाबाजी करत आनंद व्यक्त केला. फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली, गुलालाची उधळण करून एकमेकांना पेढे भरविण्यात आले. अनेक डॉक्टरांनी हा निर्णय होमिओपॅथिक वैद्यकीय क्षेत्रासाठी ऐतिहासिक असल्याचे सांगत शासनाचे आभार मानले. गुरु मिश्री होमिओपॅथिक मेडिकल कॉलेजच्या विद्यार्थ्यांनीही या आनंदोत्सवात उत्साहाने सहभाग घेतला. भविष्यात होमिओपॅथिक डॉक्टरांना अधिक चांगल्या संधी उपलब्ध होतील, असा विश्वास विद्यार्थ्यांनी व्यक्त केला.

**ग्रामीण आरोग्यसेवेला मिळणार बळ**

उपस्थित डॉक्टरांनी सांगितले की, राज्यातील ग्रामीण आणि दुर्गम भागात अनेक सीसीएमपी पात्र होमिओपॅथिक डॉक्टर आरोग्यसेवा देत आहेत. शासनाच्या या निर्णयामुळे त्यांच्या सेवेला अधिकृत मान्यता मिळण्यास मदत होईल. परिणामी ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम होण्यास हातभार लागेल आणि सर्वसामान्य रुग्णांनाही त्याचा लाभ मिळेल.

**ऐतिहासिक निर्णय असल्याची भावना**

यावेळी उपस्थित डॉक्टरांनी हा निर्णय केवळ होमिओपॅथिक डॉक्टरांसाठीच नव्हे, तर संपूर्ण आरोग्य व्यवस्थेसाठी महत्त्वाचा टप्पा असल्याचे मत व्यक्त केले. दीर्घकाळापासून प्रलंबित असलेल्या प्रश्नावर शासनाने सकारात्मक निर्णय घेतल्याने वैद्यकीय क्षेत्रातील अनिश्चितता दूर होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

अंबड चौफुली परिसरात झालेल्या या आनंदोत्सवात डॉक्टर, विद्यार्थी आणि वैद्यकीय क्षेत्राशी संबंधित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. एकमेकांना शुभेच्छा देत आणि पेढे वाटून उपस्थितांनी शासनाच्या निर्णयाचे स्वागत केले. कार्यक्रमामुळे परिसरात काही काळ उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले.

## जालन्यात अवैध

**पाच गौवंशीय जनावरांची सुटका**

कारवाईदरम्यान कत्तलीसाठी बांधून ठेवण्यात आलेली पाच लहान-मोठी गौवंशीय जनावरेही पोलिसांना आढळून आली. या जनावरांना चारा-पाण्याची कोणतीही योग्य व्यवस्था न करता बांधून ठेवण्यात आल्याचे निदर्शनास आले. पोलिसांनी तत्काळ त्यांची सुटका करून सुरक्षितपणे गौशाळेत हलविण्याची व्यवस्था केली.

**तीन संशयित ताब्यात**

या प्रकरणात पोलिसांनी शहानवाज बुढण कुरेशी (वय ३६), अरबाज बुढण कुरेशी (वय ३०) आणि सरफराज बुढण कुरेशी (रा. दानाबाजार, जालना) यांना ताब्यात घेतले आहे. त्यांच्याविरुद्ध संबंधित कायद्यांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

**१.७७ लाखांचा मुद्देमाल जप्त**

कारवाईत जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालामध्ये १३६ किलो गौमांस, कत्तलीसाठी वापरण्यात येणारे साहित्य व अन्य सामग्रीचा समावेश असून त्याची एकूण किंमत १ लाख ७७ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

**गुप्त माहितीवरून यशस्वी कारवाई**

गुप्त माहितीच्या आधारे नियोजनबद्ध पद्धतीने करण्यात आलेल्या या कारवाईमुळे नॅशनलनगर परिसरात सुरू असलेल्या कथित अवैध कत्तलखान्याचा पर्दाफाश झाला. या घटनेमुळे परिसरात काही काळ खळबळ उडाली असून पोलिसांनी कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक उपाययोजना केल्या.

चंदनझिरा पोलिसांकडून अवैध धंद्यांविरोधातील कारवाया यापुढेही अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

**अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई**

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेगबीरसिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या मोहिमेत पोलीस निरीक्षक किरण बिडवे, पोलीस उपनिरीक्षक देशमाने, स्कॉट, सय्यद तसेच मनसुब वेताळ, राजेंद्र ठाकूर, शिवाजी जमधडे, मदन बहुरे, कृष्णा तंगे, अभिजित वायकोस, सागर खैरे, राजू पवार, नवनाथ पाटील आणि सुधाकर ढाकणे यांचा समावेश असलेल्या पथकाने सहभाग घेतला.

## जालना महानगरपालिकेचा...

**मालमत्ता फेरमूल्यांकनाला प्रारंभ**

शहराच्या नियोजनबद्ध विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या जीआयएस ( ) आधारित मालमत्ता फेरमूल्यांकन आणि नकाशांकनासाठी ड्रोन सर्वेक्षणाचा शुभारंभ करण्यात आला. या प्रकल्पामुळे शहरातील मालमत्तांची अचूक माहिती डिजिटल स्वरूपात उपलब्ध होणार असून करप्रणाली अधिक पारदर्शक आणि कार्यक्षम होण्यास मदत होईल. तसेच अनधिकृत बांधकामे, मालमत्तेची अचूक नोंद आणि भविष्यातील नागरी नियोजनासाठीही या सर्वेक्षणाचा उपयोग होणार आहे.

**मोफत आरोग्य शिबिरातून नागरिकांची तपासणी**

नागरिकांच्या आरोग्याची काळजी लक्षात घेऊन वर्धापन दिनानिमित्त मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. विविध आजारांची तपासणी, वैद्यकीय सल्ला आणि आरोग्यविषयक मार्गदर्शन नागरिकांना या शिबिरात उपलब्ध करून देण्यात आले.

**विद्यार्थ्यांचा गौरव, महिलांसाठी आरोग्य उपक्रम**

महापालिकेच्या सभागृहात झालेल्या मुख्य कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि मान्यवरांच्या स्वागताने झाली. त्यानंतर महापालिका शाळांमध्ये आयोजित निबंध आणि चित्रकला स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले.

महिलांच्या आरोग्याबाबत जनजागृती करण्यासाठी पुनर्वापरयोग्य सॅनिटरी नॅपकिनचे वितरण करण्यात आले. पर्यावरणपूरक आणि आरोग्यदायी पर्याय म्हणून या उपक्रमाचे उपस्थितांनी स्वागत केले.

**सेवानिवृत्त व कार्यरत कर्मचाऱ्यांचा सन्मान**

महापालिकेच्या विकासात योगदान देणाऱ्या कार्यरत आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. त्यांना मिळणाऱ्या विविध लाभांचे प्रातिनिधिक स्वरूपात वितरण करण्यात आले. शहराच्या विकासात कर्मचाऱ्यांचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे मान्यवरांनी यावेळी नमूद केले.

प्लास्टिकमुक्त जालनाचा संदेश

पर्यावरण संरक्षणाचा संदेश देण्यासाठी प्लास्टिकमुक्त जालना या माहितीपटाचे प्रदर्शन करण्यात आले. एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकचा वापर कमी करून पर्यावरण संवर्धनात प्रत्येक नागरिकाने सहभाग नोंदवावा, असे आवाहन या माध्यमातून करण्यात आले.

व्हिजन जालना चित्रफितीतून विकासाचा आराखडा

कार्यक्रमातील प्रमुख आकर्षण ठरलेल्या व्हिजन जालना या विशेष चित्रफितीत शहराच्या भविष्यातील विकास आराखड्याची माहिती देण्यात आली. आधुनिक पायाभूत सुविधा, स्मार्ट नागरी सेवा, स्वच्छता, हरित उपक्रम, डिजिटल प्रशासन, वाहतूक सुधारणा आणि नागरिकाभिमुख विकासकामांचा वेध या चित्रफितीतून घेण्यात आला.

**नवीन बोधचिन्हाचे अनावरण**

जालना महानगरपालिकेच्या नवीन बोधचिन्हाचे (लोगो) यावेळी अनावरण करण्यात आले. बदलत्या काळानुसार आधुनिक आणि शहराच्या ओळखीचे प्रतिनिधित्व करणारे हे बोधचिन्ह महापालिकेच्या नव्या वाटचालीचे प्रतीक असल्याचे मान्यवरांनी सांगितले.

**शहराच्या विकासासाठी कटिबद्ध असल्याचा पुनरुच्चार**

यावेळी बोलताना महापौर वंदना मगरे यांनी नागरिकांच्या सहकार्याने जालना शहराचा सर्वांगीण विकास करण्यासाठी महापालिका कटिबद्ध असल्याचे सांगितले. विकासकामांमध्ये पारदर्शकता, दर्जा आणि लोकसहभागाला प्राधान्य दिले जाईल, असे त्यांनी नमूद केले.

उपमहापौर राजेश राऊत यांनी शहरातील मूलभूत सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी महापालिका सातत्याने प्रयत्नशील असल्याचे सांगितले. नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी सर्व लोकप्रतिनिधी आणि प्रशासन एकत्रितपणे काम करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

महानगरपालिका आयुक्त अंजली शर्मा यांनी तंत्रज्ञानाधारित प्रशासन, डिजिटल सेवा, करसंकलन सुधारणा, स्वच्छता, पर्यावरण संरक्षण आणि नागरिकाभिमुख उपक्रमांना आगामी काळात अधिक गती दिली जाईल, असे सांगितले.

**केक कापून वर्धापन दिनाचा आनंदोत्सव**

भाषणानंतर मान्यवरांच्या उपस्थितीत वर्धापन दिनानिमित्त केक कापून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. उपस्थितांनी एकमेकांना शुभेच्छा देत महापालिकेच्या आगामी

**वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.**

कार्यक्रमाला महापालिकेच्या विविध विषय समित्यांचे सभापती, नगरसेवक, विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार प्रदर्शनानंतर राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## जालन्यात तीन वर्षांच्या...

यासोबतच पीडित बालिकेच्या पुनर्वसनासाठी महाराष्ट्र शासनाच्या मनोधैर्य योजनेअंतर्गत ३ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याचे आदेश न्यायालयाने संबंधित यंत्रणेला दिले.

**जलद न्याय प्रक्रियेचे उदाहरण**

अत्याचारासारख्या गंभीर गुन्ह्यांमध्ये तपास आणि न्यायालयीन प्रक्रिया वेळेत पूर्ण होणे आवश्यक असल्याचे या निकालातून अधोरेखित झाले आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर अवघ्या ५७ दिवसांत अंतिम निकाल देण्यात आल्याने हे प्रकरण जलदगतीने न्याय मिळालेल्या प्रकरणांपैकी एक मानले जात आहे. प्रकृती आणि अवस्था संशयास्पद वाटल्याने कुटुंबीयांनी तिला तातडीने रुग्णालयात दाखल केले.

**वैद्यकीय तपासणीत दुखापतींची नोंद**

वैद्यकीय तपासणीत पीडित मुलीच्या शरीरावर दुखापतींच्या खुणा आढळून आल्या. त्यानंतर सदर बाजार पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध संबंधित कायद्यांखाली गुन्हा दाखल करण्यात आला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तत्काळ तपासाला गती दिली.

**विशेष तपास पथकाची स्थापना**

प्रकरणाची संवेदनशीलता लक्षात घेऊन पोलिसांनी विशेष तपास पथकाची स्थापना केली. तपास अधिकाऱ्यांनी घटनास्थळावरील पुरावे, वैद्यकीय अहवाल, साक्षीदारांचे जबाब आणि इतर तांत्रिक पुरावे अल्पावधीत संकलित केले. आवश्यक पुरावे गोळा करून आरोपीविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

तपास जलदगतीने पूर्ण झाल्यामुळे न्यायालयीन प्रक्रियेलाही वेग मिळाला आणि अवघ्या ५७ दिवसांत प्रकरणाचा निकाल लागला.

**न्यायालयाचा कठोर संदेश**

विशेष न्यायालयाने उपलब्ध पुरावे, साक्षी आणि वैद्यकीय अहवालांचा विचार करून आरोपीला दोषी ठरविले. त्यानुसार त्याला नैसर्गिक जीवनाच्या अखेरपर्यंत जन्मठेप, ५० हजार रुपयांचा दंड, तसेच दंड न भरल्यास सहा महिन्यांची सक्तमजुरी अशी शिक्षा सुनावण्यात आली.

यासोबतच पीडित बालिकेच्या पुनर्वसनासाठी महाराष्ट्र शासनाच्या मनोधैर्य योजनेअंतर्गत ३ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याचे आदेश न्यायालयाने संबंधित यंत्रणेला दिले.

**जलद न्याय प्रक्रियेचे उदाहरण**

अत्याचारासारख्या गंभीर गुन्ह्यांमध्ये तपास आणि न्यायालयीन प्रक्रिया वेळेत पूर्ण होणे आवश्यक असल्याचे या निकालातून अधोरेखित झाले आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर अवघ्या ५७ दिवसांत अंतिम निकाल देण्यात आल्याने हे प्रकरण जलदगतीने न्याय मिळालेल्या प्रकरणांपैकी एक मानले जात आहे.

## चिखलामुळे स्कुटीस्वार...

घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर एसटी बस पोलीस ठाण्यात आणण्यात आली असून अज्ञात व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यावेळी बसचे वाहक वासुदेव वरगणे यांनी सांगितले की, ''महिला चिखलामुळे स्वतः घसरून पडली होती.

एसटी बसचा तिला कोणताही धक्का लागलेला नव्हता. मात्र नागरिकांच्या गैरसमजातून काही अज्ञातांनी बसवर दगडफेक करून काचा फोडल्या.''

पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत असून दगडफेक करणाऱ्या अज्ञातांचा शोध घेत आहेत.

